**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४५/२०१९** | **दिनांक ०४/०५/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २८/०५/२०१९ ते ०३/०६/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०५/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून ०९/०६/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८/०५ | २९/०५ | ३०/०५ | ३१/०५ | ०१/०६ | ०२/०६ | ०३/०६ | | ०५/०६ | ०६/०६ | ०७/००६ | ०८/०६ | ०९/०६ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ४०.० | ४०.६ | ४१.२ | ४०.२ | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३७ | ३७ | ३८ | ३६ | ३६ |
| २५.६ | २५.६ | २५.३ | २५.४ | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २८ | २८ | २९ | २८ | २८ |
| ४ | २ | २ | २ | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ६ | ४ | ६ | ६ | ४ |
| ७५ | ६८ | ७० | ६७ | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८४ | ८६ | ८७ | ८८ | ८६ |
| ३२ | ३५ | ३६ | ३६ | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४८ | ४३ | ४७ | ५० | ५२ |
| ७.३ | ६.७ | ७.४ | ७.१ | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ६ | ६ | ८ | ७ |
| द. | नै. | नै.प. | इ.पू. | - | - | - | वाऱ्याची दिशा | वा.प. | नै.प. | नै. | प. | वा. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३५५८.३ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक ५ ते ९ जून, २०१९ पर्यंत आकाश ढगाळ राहील.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा दर्शविण्यात आला आहे तसेच प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये साधारण कोरडी स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **रोपवाटीका** | • पुढील पाचही दिवस **पाऊसाची शक्यता नसल्याने** ज्या ठिकाणी **पाण्याची उपलब्धता असेल** अशाच ठिकाणी भात पिकाची पेरणी करावी.<br>• गादीवाफ्यावर प्रती आर शेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया व ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट मिसळावे.<br>• जाड दाण्याच्या जातीसाठी हेक्टरी ५० ते ६० कि.ग्रॅ., बारीक दाण्याच्या जातीसाठी हेक्टरी ३५ ते ४० कि.ग्रॅ.आणि संकरीत जातीसाठी २० कि.ग्रॅ. बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी बियाण्यास २.५ ग्रॅम प्रती किलो प्रमाणे थायरम बुरशीनाशक चोळावे.<br>• रोपवाटीकेतील तणांच्या बंदोबस्तासाठी पेरणीनंतर वाफे ओले होताच ऑक्सीडायरजील (६ ई. सी.) प्रती लिटर पाण्यात ३ मि. ली. याप्रमाणे प्रती आर शेत्रावर ५ लिटर या प्रमाणात एकसारखे फवारावे. |
| **नागली** | **रोपवाटीका पूर्वतयारी** | • नागली रोपवाटीकेसाठी नांगरणी करून प्रती प्रती गुंठा क्षेत्रास २५० कि.ग्रॅ. कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत. |
| **चारापिके** | **पूर्वतयारी** | • चाराचवळी व मका पिकाच्या पेरणीसाठी जमिनीची नांगरट व कुळवणी करून जमीन मऊ व भुसभुशीत करावी आणि हेक्टरी ५ ते १० टन शेणखत किंवा कंपोस्ट जमिनीत मिसळावे. |
| **आंबा** | **फळपक्वता** | • काढणी योग्य फळांची काढणी 'नूतन' झेल्याच्या सहाय्याने चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर त्वरीत करावी. यामुळे फळामधील साक्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. आंब्याची फळे काढल्यानंतर सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• आंब्यावरील काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२ अं.से. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• फळांचे फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत. फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावी व बागेत स्वच्छता ठेवावी. |
| **नारळ** | **-** | • नवीन लागवड केलेल्या नारळ बागेमध्ये पावसाळ्यात लहान रोपांना कोंब कुजणे या बुरशीजन्यरोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी झाडाच्या कोंबानजीकच्या गाभ्यावर पावसाळ्यापूर्वी करावी.<br>• नारळाची पावसाळ्यात बुरशीजन्य रोगामुळे होणाऱ्या फळगळीच्या नियंत्रणासाठी पावसाळ्याच्या अगोदर १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी व त्यानंतरची फवारणी एका महिन्याच्या अंतराने पाऊस नसताना करावी. |
| **सुपारी** | **-** | • सुपारीचे कोळेरोग ह्या बुरशीजन्य रोगापासून संरक्षण करण्यासाठी पावसाळा सुरु होण्यापूर्वी झाडावरील रोगट शिंपुटे, वाळलेल्या झावळ्या गोळा करून नष्ट करावेत व पानांचा बेचक्यात १ टक्का बोर्डोमिश्रणाच्या ३ ते ४ फवारण्या एका महिन्याच्या अंतराने कराव्यात तसेच कोळेरोगाच्या यशस्वी नियंत्रणासाठी ०.३ टक्के एलिएट (फॉसिटील एल ८० टक्के पाण्यात मिसळणारी पावडर ३ ग्रम प्रती १ लिटर पाण्यात) या बुरशीनाशकाचे द्रावण सुपारी झाडांना मुळावाटे पाच हप्त्यात देण्यात यावे. यासाठी सुपारी झाडाची अन्न घेणारी दोन मुळे निवडून त्याची टोके कापून घ्यावीत. वरील प्रमाणे बुरशीनाशकाचे द्रावण तयार करून प्रत्येकी १०० मि. ली. या प्रमाणात दोन प्लास्टिक पिशव्यात भरून कापलेली मुळे पिशवीत व्यवस्थित बुडवून पिशव्या मुळाला बांधून घ्याव्यात. सदरच्या बुरशीनाशकाचा पहिला हप्ता पावसाळा सुरु होण्यापूर्वी देण्यात यावा. |
| **भाजीपाला/ फळबाग रोपवाटीका** | **रोपवाटीका** | • खरीप हंगामासाठी वांगी, मिरची आणि टोमेटो भाजीपाला पिकाची रोपे तयार करण्याकरिता ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर क्षेत्रास ५ कि.ग्रॅ. शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून **पाण्याची उपलब्धता असल्यास** भाजीपाला बियाणांची पेरणी करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास ३ ग्रॅम प्रती किलो प्रमाणे थायरम बुरशीनाशक चोळावे.तसेच रोपांचे मर रोगापासून संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी. रुजवा चांगला होण्यासाठी वाफे भाताच्या पेंढयाने आच्छादावेत. उगवण होईपर्यंत वाफ्यांना नियमित पाणी द्यावे. फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**